# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)
(०२३५८) २८२३८७

अंक ४७/२०२० | दिनांक १२/०६/२०२० | कालावधी ५ दिवस

| डॉ. प्रशांत बोडके, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०६/०५/२०२० ते १२/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १३/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून १७/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६/०६ | ०७/०६ | ०८/०६ | ०९/०६ | १०/०६ | ११/०६ | १२/०६ | | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ | १७/०६ |
| ३.६ | ४.६ | ४५.८ | १९.४ | ८.० | १८.२ | १३.० | पाऊस (मिमी) | ४५ | ९८ | ९४ | ९० | ४७ |
| ३३.० | ३१.४ | ३२.५ | ३०.० | ३१.४ | ३२.२ | ३१.२ | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३२ | ३२ | ३१ | ३२ |
| २४.५ | २३.५ | २१.० | २३.५ | २३.० | २२.५ | २४.० | किमान तापमान (अं.से) | २४ | २५ | २५ | २४ | २४ |
| ६ | ६ | ६ | ४ | ४ | ४ | ६ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ६ | ८ | ८ | ८ | ८ |
| ९० | ९० | १०० | ८९ | ९२ | ९६ | ९६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९० | ९२ | ९३ | ९५ | ९४ |
| ७७ | ७२ | ६७ | ७८ | ७५ | ७६ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६४ | ६५ | ६९ | ८३ | ८९ |
| ६.१ | ६.८ | ७.७ | २.९ | ५.२ | ४.२ | ६.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ५ | ८ | १२ | १४ |
| प. | प. | नै. | आ. | नै. | नै. | ऊ. | वाऱ्याची दिशा | द. | द. | नै.द. | नै.द. | नै.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ११२.६ | ३५८.८ | ५१३०.९ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १३ ते १७ जून, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| खरीप भात | रोपवाटिका | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• भात क्षेत्रातील बांधांची बांधबंधीस्ती करावी तसेच बांध तणमुक्त ठेवावेत.<br>• बांधावरील खेकड्यांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिलाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही.) |
| नागली | रोपवाटिका | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नागली पिकाच्या रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| आंबा आणि काजू | - | • दहा वर्षावरील आंबा कलमास ५० ते १०० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, ३ किलो २५० ग्रॅम युरिया, ३ किलो १२५ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट व २ किलो सल्फेट ऑफ पोटॅश खते प्रती कलमास पावसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी. खते कलमाच्या विस्ताराच्या आत सुमारे ४५ ते ६० सें.मी. रुंद आणि १५ सें.मी. खोल वर्तुळाकार चर खणून द्यावीत. चरामध्ये प्रथम पालापाचोळा, शेणखत टाकून त्यावर रासायनिक खते टाकून मातीने चर बुजवून घ्यावे.<br>• आंबा आणि काजू बागेची साफसफाई करावी. ज्या ठिकाणी आंबा आणि काजूची झाडे चक्रीवादळामुळे पिळवटली असतील अशी झाडे पिळवटलेल्या भागाखाली तिरकस काप देवून कापलेल्या भागाला १ टक्का बोर्डो पेस्ट लावावी. तसेच क्लोरपायरीफॉस २०% प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात द्रावण करून संपूर्ण झाडावर पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी.<br>• १० ते १५ वर्षा पेक्षा कमी वयाच्या बागेमधील नुकसान ग्रस्त झाडे उभी करून घेवून उपलब्ध साधनांचा वापर करून व्यवस्थित आधार देवून उभी करून घ्यावीत आणि बुंध्यालगत ३-४ घमेले शेणखत किंवा गांडूळखत + २ किलो सिंगल सुपर फोस्फेट मिसळून मातीची चांगली भर द्यावी.<br>• संपूर्ण झाडांवर १ टक्का बोर्डोमिश्रण आणि कलोरपायरीफॉस २०% प्रवाही २ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र फवारणी करावी. गरज पडल्यास १५ ते २० दिवसांनी पुन्हा फवारणी घ्यावी.<br>• आंबा बागांमध्ये फळगळ झालेली फळे गोळा करून खोल जमिनीत गाडून द्यावीत जेणेकरून पुढील हंगामात फळमाशीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.<br>• ज्या झाडांचे पुनरुज्जीवन करणे शक्य होणार नाहीत अशी झाडे धारदार हत्याराने कापून त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी. अशा साफसफाई केलेल्या जागेमध्ये नवीन लागवड करावी. |
| नारळ व सुपारी | - | • नारळाच्या पाच वर्षावरील माडाला ३० कि.ग्रॅ. शेणखत, ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट, ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा प्रति माड पावसाची तीव्रता कमी असताना बांगडी पध्दतीने देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ |

| | | |
|---|---|---|
| | | पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत.<br>• नारळ आणि सुपारीच्या बागांची साफसफाई करावी. चक्रीवादळामुळे कमी वयाची वाकलेली सुपारीची झाडे उपलब्ध साधनांचा वापर करून उभी करून घ्यावीत आणि बुंध्यालगत २-३ घमेले चांगले कुजलेले शेणखत किंवा गांडूळखत + २ किलो सिंगल सुपर फोस्फेट देवून मातीची चांगली भर द्यावी. सुपारीच्या सर्व उभ्या झाडांना १ टक्का बोर्डोमिश्रणाची आळवणी करावी.<br>• चक्रीवादळामुळे नारळ आणि सुपारीची उन्मळून पडलेली तसेच पिळवटलेली झाडे धारदार हत्याराने कापून त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी.<br>• चक्रीवादळात सर्व नारळाच्या सुऱ्यास इजा झाल्याची शक्यता असल्याने शक्य असल्यास १ टक्का बोर्डोमिश्रण तसेच कलोरपायरीफॉस २०% प्रवाही २ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून यांचे स्वतंत्र द्रावण नारळाच्या सुऱ्यामध्ये ओतावे. |
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • रोपवाटीकेतील वांगी, मिरची, टोमेटो इ. भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा पाऊसाची तीव्रता पाहून द्यावीत.<br>• पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**